# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २१ फेब्रुवारी २०१९

## पालघर, सिंदखेडराजा व लोणार नगरपरिषदेसाठी २४ मार्चला मतदान

मुंबई, दि. २१ (रा.नि.आ.): पालघर (जि. पालघर), सिंदखेडराजा आणि लोणार (जि. बुलढाणा) या तीन नगरपरिषदेच्या अध्यक्ष व सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २४ मार्च २०१९ रोजी मतदान होणार असून त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, पालघर, सिंदखेडराजा व लोणार या नगरपरिषदांच्या मुदती एप्रिल २०१९ मध्ये संपत आहेत. या नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २८ फेब्रुवारी ते ७ मार्च २०१९ या कालावधीत नामनिर्देनपत्र स्वीकारली जातील. ३ व ४ मार्च २०१९ या शासकीय सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देनपत्रांची छाननी ८ मार्च २०१९ रोजी होईल. मतदान २४ मार्च २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत होईल. मतमोजणी २५ मार्च २०१९ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)